क्र. अका/गौख/रेलि/कावि- 04/18,
कार्यालय जिल्हाधिकारी, वर्धा.
दिनांक : 02/01/2018.

# जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

# रेतीघाट निर्गतीकरीता ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) सुचना

• लिलाव प्रकिया (भाग-1) मधील फेरलिलाव क्र. 03 •
(हातची किंमत 25 % कमी)
• लिलाव प्रकिया (भाग-2) मधील फेरलिलाव क्र. 01 •

## सन 2017-18

वर्धा जिल्हयातील वाळूघाट लिलाव घेणारे सर्व ईच्छुक लोकांना याव्दारे सुचीत करण्यात येत आहे की, वर्धा जिल्हा रेतीघाट लिलाव प्रक्रिया 2017-18 भाग-1 मधील फेरलिलाव क्र. 03 (हातची किंमत 25 % कमी) तसेच भाग-2 मधील फेरलिलाव क्र. 01 (दि. 01/10/2017 ते दि. 30/09/2018 या कालावधीकरीता) लिलाव घेण्यात येणार आहे. लिलावाबाबतचा ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | तपशिल |
|---|---|
| 05/01/2018 | सकाळी 10.00 वाजतापासुन बिडर रजिस्ट्रेशन (संगणकिय नोंदणी) सुरु होईल व ई-निवीदा (ई-टेंडर) भरण्याकरीता उपलब्ध होईल. |
| 15/01/2018 | सायंकाळी 06.00 वाजता बिडर रजिस्ट्रेशन (संगणकिय नोंदणी) करणे बंद होईल. |
| 19/01/2018 | सायंकाळी 06.00 वाजता ई-निवीदा (ई-टेंडर) भरणे बंद होईल. |
| 20/01/2018 | दुपारी 12.00 वाजतापासुन वेबसाईटवर प्राप्त ई-निवीदा (ई-टेंडर) डाऊनलोड करुन जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे दुपारी 12.00 वाजता उघडण्यात येईल.<br>दुपारी 02.00 ते 04.00 वाजेपर्यंत घाटनिहाय ई-लिलाव (ई-ऑक्शन) प्रक्रिया घेण्यात येईल. (वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकिय प्रणाली द्वारे प्रत्येक 10 मिनीट प्रमाणे 3 वेळा वाढ करण्यात येईल.) |

वाळूलिलावाच्या अटी व शर्ती **www.wardha.nic.in** व **https://wardhaco.abcprocure.com** या वेबसाईटवर बघावयास मिळेल तसेच खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथुन प्राप्त करता येईल. त्याचप्रमाणे दुरध्वनी क्रमांक 07940016811, 840, 843, 848, 866, 886, 852/ 07940227055, 569, 507, 596, 566 वर रजिस्ट्रेशनबाबत माहिती घेता येईल.

अपर जिल्हाधिकारी, वर्धा.

**वर्धा जिल्ह्यातील सन 2017-18 (भाग-1) या वर्षाकरीता 30.09.2018 पर्यंतच्या मुदतीकरीता ई-निविदा व ई-ऑक्शन द्वारे घेण्यात येणाऱ्या फेरलिलाव क्र. 03 (हातची किंमत 25% कमी) करीता मंजुर हाताची किंमत व लिलावामध्ये भाग घेणे करीता जमा करावयाची सरफेस रेंट व अनामत रक्कम**

| अ. क्र. | तालुका | रेतीघाटाचे नाव | नदी / नाल्याचे नाव | रेतीघाटाचा किंवा जवळचा सर्व क्रमांक | लांबी X रुंदी | आराजी (हे.आर. मध्ये) | भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे नुसार रेती उत्खनन प्रस्तावित (मिटर मध्ये) | अंदाजित साठा (ब्रास मध्ये) | सन 2017-18 मधील रेतीघाट सरफेस रेन्ट रुपये मध्ये | सन 2017-18 धील रेतीघाट लिलावाची एकुण किमत (हातची किमत-25% कमी) | निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम (रु. 3,00,000/- किंवा हातच्या किमतीचे 20% रक्कम) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | आष्टी | वर्धा नदी | वाघोली | 5 अंशत: | 426X22 | 0.94 | 0.50 | 1656 | 12652 | 2510082 | 502016 |
| 2 | आष्टी | वर्धा नदी | चिचोली | 4, 5, 10, 11 | 622X70 | 4.35 | 0.40 | 6154 | 58779 | 9327926 | 1865585 |
| 3 | आष्टी | वर्धा नदी | दलपतपूर | 2, 3, 132 अंशत: | 550X75 | 4.13 | 0.40 | 5830 | 55688 | 8836823 | 1767365 |
| 4 | आर्वी | वर्धा नदी | सायखेडा | 22 ते 29, 31 अंशत: | 1400X30 | 4.20 | 0.50 | 7420 | 56700 | 11246865 | 2249373 |
| 5 | आर्वी | वर्धा नदी | सालफळ | 7, 8, 9, 14, 15, 16, 17/1अ, 18 | 700X40 | 2.80 | 0.50 | 4947 | 37800 | 7498415 | 1499683 |
| 6 | हिंगणघाट | वर्धा नदी | सातेी-1 | 95/3, 95/4, 95/5 | 245X40 | 0.98 | 0.50 | 1731 | 13230 | 2623763 | 524753 |
| 7 | हिंगणघाट | वर्धा नदी | पोहणा | 22, 30 | 500X60 | 3.00 | 0.50 | 5300 | 40500 | 8033475 | 1606695 |
| 8 | हिंगणघाट | वना नदी | जुनोना | 29, 30, 32, 33, 36, 37 | 550X31 | 1.71 | 0.50 | 3012 | 23018 | 3792861 | 758572 |
| 9 | हिंगणघाट | वना नदी | हिंगणघाट-2 (धोबीघाट) | 33, 34/1, 35 अंशत: | 420X25 | 1.05 | 0.50 | 1855 | 14175 | 2335909 | 467182 |
| 10 | हिंगणघाट | वर्धा नदी | कात्री | 181 अंशत:, 185, 186 | 240X30 | 0.72 | 0.50 | 1272 | 9720 | 1928034 | 385607 |
| 11 | हिंगणघाट | वना नदी | बिड सोनेगांव (रीठ) | 3 अंशत: | 450X25 | 1.13 | 0.50 | 1988 | 15188 | 2503389 | 500678 |
| 12 | हिंगणघाट | वना नदी | बोरखेडी | 28, 30 | 220X20 | 0.44 | 0.50 | 777 | 5940 | 978437 | 300000 |
| 13 | हिंगणघाट | वना नदी | नांदगांव (बो.)-2 | 16/1, 16/2अ, 16/2ब, 16/3, 17/1, 17/2, 18/1, 18/2, 18/3, 18/4, 22 | 450X25 | 1.13 | 0.50 | 1988 | 15188 | 2503389 | 500678 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | हिंगणघाट | वना नदी | पारडी (नगाजी) | 82, 84 | 520X31 | 1.61 | 0.50 | 2848 | 21762 | 3586344 | 717269 |
| 15 | हिंगणघाट | वना नदी | चिकमोह | 90, 95, 96, 97, 107, 108, 109, 129, 130 | 673X46 | 3.10 | 0.50 | 5470 | 41793 | 6888098 | 1377620 |
| 16 | हिंगणघाट | पोथरा नदी | चिचघाट | 19, 20, 23, 27, 28, 30 | 365X15 | 0.55 | 0.50 | 967 | 7391 | 431524 | 300000 |
| 17 | हिंगणघाट | वर्धा नदी | धोची | 129, 130, 135, 136, 168, 170, 172, 173/1 | 780X50 | 3.90 | 0.50 | 6890 | 52650 | 10443518 | 2088704 |
| 18 | समुद्रपुर | वना नदी | शिवणी-1 | 128 अंशत:, 69 | 213X38 | 0.81 | 0.50 | 1430 | 10927 | 1800728 | 360146 |
| 19 | समुद्रपुर | वना नदी | शिवणी-2 | 22/1 अंशत:, 22/2 अंशत: | 305X61 | 1.86 | 0.50 | 3287 | 25117 | 4139155 | 827831 |
| 20 | समुद्रपुर | वना नदी | सेवा-1 | 11 अंशत: | 213X46 | 0.98 | 0.50 | 1731 | 13227 | 2179762 | 435952 |
| 21 | समुद्रपुर | वना नदी | सेवा-2 | 86, 87 | 366X46 | 1.68 | 0.50 | 2975 | 22729 | 3746269 | 749254 |
| 22 | समुद्रपुर | वना नदी | मांडगाव -1 | 219 अंशत:, 220 | 420X60 | 2.52 | 0.50 | 4452 | 34020 | 5606181 | 1121236 |
| 23 | समुद्रपुर | वना नदी | मांडगाव-2 | 286, 287, 288, 298, 344, 345, 861 | 700X60 | 4.20 | 0.50 | 7420 | 56700 | 9343635 | 1868727 |
| 24 | समुद्रपुर | धाम नदी | सावंगी (देरडा) | 231 अंशत: | 152X30 | 0.46 | 0.50 | 806 | 6156 | 1044576 | 300000 |
| 25 | समुद्रपुर | वना नदी | वंदली (रीठ) | 74 अंशत:, 75 | 427X46 | 1.96 | 0.50 | 3470 | 26517 | 4369598 | 873920 |
| | | | | एकुण | | | | 85676 | 677565 | 117698756 | 23948846 |

अपर जिल्हधिकारी, वर्धा.

**वर्धा जिल्ह्यातील सन 2017-18 (भाग-2) या वर्षाकरीता 30.09.2018 पर्यंतच्या मुदतीकरीता ई-निविदा व ई-ऑक्शन द्वारे घेण्यात येणाऱ्या फेरलिलाव क्र. 01 करीता मंजुर हाताची किंमत व लिलावामध्ये भाग घेणे करीता जमा करावयाची सरफेस रेंट व अनामत रक्कम**

| अ. क्र. | तालुका | रेतीघाटाचे नाव | नदी / नाल्याचे नाव | रेतीघाटाचा किंवा नवळचा सर्वे क्रमांक | लांबी X रुंदी | आराजी (हे.आर. मध्ये) | भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे नुसार रेती उत्खनन प्रस्तावित (मिटर मध्ये) | अंदाजित साठा (ब्रास मध्ये) | सन 2017-18 मधील रेतीघाट सरफेस रेन्ट रुपये मध्ये | सन 2017-18 मधील रेतीघाट लिलावाची एकुण किंमत (हातची किंमत) | निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम (रु. 3,00,000/- किंवा हातच्या किंमतीचे 20% रक्कम) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | आष्टी | नवाबपूर | वर्धा नदी | 2, 3, 5 | 300X30 | 0.90 | 0.50 | 1590 | 12150 | 8951700 | 1790340 |
| 2 | आर्वी | वडगाव | वर्धा नदी | 12, 13, 14, 16, 17 | 300X30 | 0.90 | 0.50 | 1590 | 12150 | 2491530 | 498306 |
| 3 | आर्वी | दिघी-वडगाव | वर्धा नदी | दिघी-113, 112<br>वडगाव-124, 125, 126, 132, 133, 134, 135 | 1200X30 | 3.60 | 0.50 | 6360 | 48600 | 14437200 | 2887440 |
| 4 | हिंगणघाट | चिंचोली-1 | वना नदी | 6, 5/2, 265 | 451X31 | 1.40 | 0.50 | 2470 | 18900 | 4147130 | 829426 |
| 5 | हिंगणघाट | झगडी (रि.) | वर्धा नदी | 5, 6 ,7, 8, 9/1 | 275X35 | 0.96 | 0.50 | 1701 | 12960 | 2034396 | 406879 |
| 6 | हिंगणघाट | काजळसरा | पोथरा नदी | 270, 273, 274, 269 | 454X30 | 1.36 | 0.50 | 2406 | 18360 | 1739538 | 347908 |
| 7 | समुद्रपूर | औरंगपुर (रिठ)-1 | वना नदी | 18 | 152X30 | 0.46 | 0.50 | 806 | 6210 | 1477398 | 300000 |
| | | | | एकुण | | | | 16923 | 129330 | 35278892 | 7060299 |

अपर जिल्हधिकारी, वर्धा.

# रेतीघाट निर्गतीकरीता ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) सुचना

वर्धा जिल्हा रेतीघाट लिलाव प्रक्रिया सन 2017-18 (कालावधी दि. 01/10/2017 ते दि. 30/09/2018 पावेतो) करीता ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) द्वारे रेती/वाळूची निर्गती करणेसाठी लिलाव करण्यात येत आहे.

लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन घेण्यात येणारी रु. 3,00,000/- किंवा हातच्या किंमतीच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम, नेट बँकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड (एन.ई.एफ.टी./आर.टी.जी.एस.) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय) जमा करावे लागेल.

वरील व इतर अटीसह सविस्तर माहिती www.wardha.nic.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आले आहे. इच्छुक कंत्राटदारांना ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) मध्ये भाग घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

उपरोक्त संकेतस्थळावर (वेबसाइटवर) इच्छुक कंत्राटदारांना संगणकीय नोंदणी (Online Registration) करणे आवश्यक आहे. संगणकीय नोंदणी (Online Registration) करीता डिजीटल सीग्नेचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. तसेच ई-मेल पत्ता, पॅन कार्ड, टिन नंबर (सर्टीफीकेट), मागील दोन वर्षाचे आयकर व विक्रीकर प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा इत्यादी अपलोड करुन ऑनलाईन रजिस्ट्रेशन करता येईल.

अटी व शर्तीनुसार ई-निवीदा भरु इच्छुनाऱ्या व्यक्तींना निविदा,

1] ज्या वाळुघाटाची हातची किंमत (ऑफसेट प्राईस) रु. 10,00,000/- (अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा जास्त आहे, त्याकरीता अर्ज फी रु. 5000/-, प्रोसेसिंग फी रु. 1593/- असे एकुण रु. 6593/- भरावे लागेल.

2] ज्या वाळुघाटाची हातची किंमत (ऑफसेट प्राईस) रु. 10,00,000/- (अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा कमी आहे त्याकरीता अर्ज फी रु. 2000/-, प्रोसेसिंग रु. 1593/- असे एकुण रु. 3593/- ना परतावा ई-पेमेंट जसे नेट बँकींग/ क्रेडीट कार्ड/ डेबीट कार्ड पध्दतीने भरावे लागेल.

तसेच अटी व शर्तीनुसार ई-निवीदा (ई-टेंडरींग) व ई-लिलाव (ई-ऑक्शन) मध्ये भाग घेणाऱ्यांना प्रत्येक घाटाकरीता रु. 3,00,000/- किंवा हातची किंमत (ऑफसेट प्राईस) चे 20% यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणुन भरावी लागेल. सदर रक्कम (E.M.D.) म्हणुन वरील पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल. ज्या कंत्राटदारांनी ई-निवीदा (ई-टेंडर) ज्या रेती घाटासाठी भरले असेल त्या रेतीघाटासाठी ई-लिलाव (ई-ऑक्शन) पध्दतीने भाग घेता येईल. रेतीघाटासंबंधीची करारपत्र, अटी व शर्तीचे तसेच रेतीघाटाची हातची किंमत (ऑफसेट प्राईस) ची विस्तृत माहिती उपरोक्त नमुद वेबसाईट / संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयतील खनिकर्म विभाग, संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सर्वोच्च बोली ज्याचे नावे मंजुर होईल, त्यांना मंजुर रक्कमेवर 10% मुल्यवर्धीत कर व 2% आयकर वेगळे भरावे लागेल.

# परिशिष्ट "अ"
## वाळू लिलावधारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती

1] मा. राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेल्या याचिका क्र. MA No. 601/602/608/609/2017, OA368/2015 मधील आदेश व मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले आदेश निविदाधारक/लिलावधारक यांना लागू राहतील. तसेच मा. राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेली याचिका क्र. 91/2017 (WZ) M.A. 289/2017 मधील आदेशानुसार निविदाधारक/लिलावधारक यांनी लिलावात घेतलेल्या वाळू घाटाचा खाणकाम आराखडा ताबा घेण्यापूर्वी तयार करुन सादर करावा लागेल तसेच सदर खाणकाम आराखडयास जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाची पर्यावरण मान्यता घेणे बंधनकारक राहील.

2] वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमत) पेक्षा अधिक बोलीने ई-ऑक्शनव्दारे लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

3] ई-टेंडर / ई-ऑक्शनव्दारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रक्कमा हाताच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळूगटाचा 10 दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

4] ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणुन रु. 3,00,000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा ऑफसेट प्राईजच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम Online भरावी लागेल.

परंतु ज्या वाळूगटाची हातची किंमत रुपये 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखीने भरावी लागेल.

ज्या लिलावधारकाची अत्युच्च बोली/ निवीदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित करण्यात येईल. ज्या लिलावधारकाची बोली/निवीदा स्विकारण्यात येणार नाहीत, त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.

5] लिलावाने घ्यावयाच्या रेती / वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाही याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

6] ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी/ अप्पर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

7] **ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर व सर्वोच्च बोलीच्या 1/4 रक्कम भरल्यानंतर 15 दिवसात बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतचा हमीचे दायीत्व स्विकारणाऱ्या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रु. 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकनावर (स्टॅम्प पेपर) करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित वाळू / रेतीगटाचा फेरलिलाव करण्यात येईल.** तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परीणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी अ.क्र. 3 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75% रक्कम सर्वोच्च बोली स्विकारल्यापासुन 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली 75% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

लिलावधारकाने रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्याच्या दिनांकापासुन उशीरात उशीरा 7 दिवसाच्या आत तहसिलदार यांच्याकडुन लिलावधारकाने अटी व शर्तीमधील सर्व बाबीची पुर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतर लिलावधारकास वाळु स्थळाचा ताबा देण्यात येईल.

8] ज्यावेळी रेती/ वाळु (ठेका) लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती/ वाळु क्षेत्राचा नव्याने ई-टेंडर / ई-ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पुर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत असल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या लिलावधारकाकडुन जमीन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल. तथापी, फेरलिलावात पुर्वीच्या किमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत असल्यास त्यावर पुर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

9] लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने जमीनीची धुप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

10] विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

11] कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने 600 मिटर्स (2000 फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी-नाल्यांवर पूल आहेत, त्यांच्या स्तंभापासून 100 मीटर्स पर्यंत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

12] जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविणेत यावी.

13] वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहिल. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

14] लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

लिलावधारकास कोणत्याही वैध करणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किमंतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रककम परत करतांना लिलावाची देकारची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळू साठा विचारात घेवून त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

15] उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू /रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या/रेतीच्या किमतीबाबत

अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/ रेती साठा करण्यास परवानी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

16] लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था / संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

17] लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.

18] लिलावधारकोने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे.

19] लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी 30 सप्टेंबर रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपतीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

20] उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही. अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

21] नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

22] रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

23] लिलावधारकाने गावक-याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

24] रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

25] केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक काआ 141(अ), दि. 15/01/2016 मधील परिशिष्ट 12 मधील अनुक्रमांक 01 नुसार वाहतूक पास देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

26] लिलावधारक निर्धारीत वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठुन जाणार आहे, त्या दोन ठिकाणामधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणिकृत मोबाईलवरुन एसएमएसव्दारे (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडुन लिलावधारकास नोंदणिकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास एसएमएसव्दारे इनव्हाईस/टोकन नंबर प्राप्त होईल. असा इनव्हाईस/टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू / रेतीचे वाहतूक करता येणार नाही. टोकन नंबर शिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरुन त्यावर प्रचलीत कायदे व धोरणानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

27] वाळू/रेती वाहतूक करणा-या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

28] वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे वैध टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरिक्षण संबंधीत महसूल यंत्रणेकडून, नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तीकडून केले जाईल. अशा निरिक्षणाच्या वेळी संबंधीत वाहन चालकाकडून वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसलू संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 आणि संदर्भाधिन दिनांक 12/03/2013 च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

29] वाळू/रेती लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून,मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

30] गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहु हिशोब व कागदपत्रे संबधीत महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत.

31] लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये 3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी याच्यांकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. 10 लाख पेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20% रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

32] लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदींनुसार असलेले नियम (संबधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार तसेच अन्य कायदे / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

33] लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

34] कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे / बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

35] सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे अवश्यक आहे.

36] वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

37] अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

38] अवैध वाळू /रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार तसेच इतर लागु होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

39] लिलाव मंजूर करणेत आलेल्या वाळू गटांना वाळू उत्खननाकरिता संक्शनपंपाचा वापर करावा लागेल अशा वाळू गटांना शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0616/प्र.क्र.390/ख, दि. 02 जुलै, 2016 नुसार परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देणेत येईल.

40] लिलावधारकांने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

41] दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

42] शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

43] लिलावधारकाने त्याला नेमुन दिलेल्या जागेतुन उत्खनन केलेल्या वाळुचे / रेतीचे खरेदी करणाऱ्याचे नाव व पत्ता दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिण्याच्या 10 तारखेस सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करावे.

44] वाळू/रेतीचे उत्खनन केवळ सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

45] रेतीचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळुन आल्यास लिलावधारकाने / ठेकेधारकाने सक्षम प्राधिकाऱ्यास 7 दिवसांत कळविले पाहीजे.

46] धरण/नदी/नाले यापासुन रेतीघाटात पाणी शिरल्यास होणारे नुकसानाची भरपाई शासनाकडुन मिळणार नाही. ही वैयक्तीक जबाबदारी रेतीघाटधारकांची राहील.

47] शासन निर्णय गौखनि/10/0512/प्र.क्र. 300/ख, मंत्रालय मुंबई, दिनांक 12/03/2013 मधिल नमुद अटी व शर्ती तसेच शासन निर्णय क्रमाक गौखनि-10/1014/प्र.क्र.498/ख, दिनांक 26/डिसेंबर/2014 इतर सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

48] परवान्यात मंजुर केलेला रेतीसाठा काढुन संपल्यावर किंवा परवान्यात परवान्याची मुदत संपल्यानंतर परवानाधारक परवाना आणि काढुन घेण्यात आलेल्या खनिज मालाचे परीमाण, वाहतुकीचे व ज्यांना माल विकण्यात आला त्या पक्षकाराचे नाव व त्यासाठी मिळालेली किंमत यांचे तपशिल दर्शविणारे संपूर्ण विवरणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याला सादर करेल आणि सक्षम अधिकाऱ्याने छाननी करण्यासाठी मागणी केल्यानुसार कोणतेही तपशिल, नोंदवहया त्याचे कडे सादर करेल.

49] रेतीची वाहतूक करतांना गावातील नागरीकांना त्याचा त्रास होणार नाही किंवा त्यांना जिवीत वा वित्तीय हानी पोहचणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी रेतीघाटधारक यांची राहील. तसेच वापर करण्यात येत असलेले रस्ते खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी अथवा रेती/वाळू वाहतुकीकरीता उपलब्ध झाल्यास गावाचे बाहेरील रस्त्याचा वापर करण्यात यावा तसेच शाळा सुरु होणे व सुटण्याचे वेळी वाहतूक करता येणार नाही.

## पर्यावरण विभागाने घालून दिलेल्या अटी

**Specific Conditions:**

1. Proposals are recommended for environmental clearance for the period 2017-18
2. Provisions stipulated in Maharashtra Minerals Extraction (development and regulation) Rules 2013 and Government Resolution of Revenue and Forest Department dated 12/03/2013.
3. Project Proponent/Lessee will be held responsible individually for non compliance of the conditions stipulated in the Environmental clearance and shall be liable for legal action under Environmental Protection Act of 1986.

4. District collector will take bank guarantee up to 2% of the total auction cost for the given auction period from project proponent to ensure the compliance of the conditions stipulated. In case of violation of stipulated conditions by the project proponent bank guarantee so obtained shall be forfeited and legal action under the law should be initiated against such project proponent.
5. The depth of sand layer to be mined, after retaining 2m minimum layer below, should not be more than 2m as per Government Resolution of Revenue Department dated 12th March 2013 e.g. if the depth of sand is 3 m, only up to one meter of sand shall be mined.
6. It shall be ensured that excavation of mineral does not disturb or change the underlying soil characteristics of the river bed/basin, where mining is carried out.
7. It shall be ensured that mining does not in any way disturb the turbidity, velocity and flow pattern of the river water.
8. A siltation study should be carried out before commencement of the mining activity or within a period of one year though some expert Agency like NIO/CWPRS to determine the siltation load so that there is no over exploitation of the material at any point of time. the mineral to be removed shall be determined based on siltation load. This study shall be steered by competent authority while granting further mining lease and or renewing of the license. A copy of siltation study shall be submitted to the Environment Department , the District Mining Officer respective Regional of the state Pollution Control Boards.
9. It shall be ensured that there is no fauna dependant on the river bed or area close to mining for its nesting.
10. Turtle nesting units conservation is very important. Therefore sand mining in such areas is to be prohibited.
11. The green belt development plantation will be made in an area of 20%of the total lease area either on river bank or along road side
12. Measure for prevention & control of soil erosion and management of site shall be undertaken. Protection of dumps against erosion, if any shall be carried-out with geo textile matting or other suitable material.
13. Project Proponent/Lessee to ensure that there is no violation of the Supreme Court order and orders of the National Green Tribunal given in related matters.
14. Mining operations shall be as per Sustainable "Sand Mining Management Guidelines" issued by MoEF & CC, Govt. of India, new Delhi time to time.
15. Mining operations shall be as per Mining Plan approved by competent authority.
16. Underwater Sand mining by means of Suction Pump may be granted as per guidelines by state Government on recommendations by DEAC & DEIAA.
17. District Collector to ensure that conditions stipulated in the Government Resolution (G.R.) dated 12/03/2013 & 16/10/2015 issued by revenue and Forest Department of Maharashtra (GoM) and Office Memorandum (O.M.) of Ministry of Environment and Forest (MoEF), dated 24/12/2013 is implemented in letter and spirit.

**General Conditions :**

1. Precise mining area will be jointly demarcated at site by officials of Mining Revenue department prior to mining operation for all proposal under consideration. Such site

plan, duly verified by competent authority shall be submitted to Environment Department.

2. All necessary statutory clearances shall be obtained before start of mining operations
3. Mining shall be limited to day hours time only. The loading shall not be done during night hours.
4. No mining shall be carried out in the safety zone of any bridge and/or embankment.
5. No mining shall be carried out in the vicinity of nature/manmade archeological sites.
6. The lease holder shall obtain necessary prior permission of the competent authorities for drawal of requisite quantity of water (surface water and groundwater), if required for the project.
7. Waste water, if, any, shall be properly collected and treated so as to the standards prescribed by MoEF /CPCB.
8. No wildlife habitat will be infringed.
9. Environmental clearance is subjects to obtaining clearance under the Wildlife (Protection) Act, 1972 from the competent authority, if applicable to this project.
10. Green belt development shall be carried out considering CPCB guidelines including section of plant species and I consultation with the local DFO/Horticulture Officer.
11. Parking of vehicles should not be made on public places.
12. Transportation of materials shall be done by covering the trucks/tractor with tarpaulin or other suitable mechanism so that spillage of mineral/dust take place.
13. Appropriate mitigative measures shall be taken to prevent any kind of of pollution in consultation with the Maharashtra pollution Control Boards. It shall be ensured that there is no leakage of oil and grease from the vehicles used for transportation.
14. Vehicular emissions shall be kept under control and regularly monitored. The mineral transportation shall be carried out though the covered the trucks only and the vehicles carrying the mineral shall not be overloaded.
15. Special Measures shall be adopted to prevent the nearby settlements from the impacts of mining activities. Maintenance of roads though which transportation of minor minerals is to be undertaken, shall be carried-out regularly.
16. Dispensary facilities for first-aid shall be provided at site.
17. Occupation health surveillance program of the workers should be undertaken periodically.
18. Provision shall be made housing the workers site, if required, with all necessary infrastructure and facilities such as fuel for cooking, safe drinking water, medical health care and sanitation etc.
19. Ambient air quality will be monitored at the site nearest habitation in the month of January, April and November. Ambient air quality at the boundary of the precise mining area shall conform to the norms prescribed by MoEF, GOI.
20. Measures shall be taken for control of noise level to the limits prescribed by CPCB.
21. An Environmental Audit shall be annually carried out during the operational phase and be submitted to the Environment Department.
22. Digital processing of the entire lease area in the district using remote sensing technique shall be done regularly once in three for monitoring and report submitted to the Environment Department.

23. Revenue Authorités shall submit within 3 months their policy address (i) Standard operating process / procedure t bring into focus any infringement / violation of environmental norms / conditions, (ii) Hierarchical system or Administrative order to deal with environmental issues and ensuring compliance of EC conditions and (iii) system of reporting of non complianance/violation of environmental norms to the District collector
24. Project Proponent/Lessee shall submit six monthly reports in hard and soft copy on the status of compliances of the stipulated environmental clearance condition including results of monitored data (both in hard & soft copies) to the Environment department and the District Collector, the respective office of the Maharashtra Pollution Control Boards.
25. Any change in mining area, khasra /Gat numbers, capacity addition with change in process and or mining technology, modernization and scope of working shall again require prior Environmental Clearance as per provisions of EIA Notification, 2006 (as amended)
26. DEAC appraised the proposals on the basis of information submitted by concerned Tahsildar (Revenue).
27. At the entry side of sandghat Flood light and close circuit Televisior (CCTV) is necessary. Recording shall be submitted to concern Tahsildar each months.

************************************************************************

वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करु न लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

************************************************************************

अपर जिल्हाधिकारी, वर्धा.